# रणशूर स्वामिनिष्ठ जिवबादादा बक्षी

# यांचा

# पोवाडा

: ७ :

## प्रास्ताविक

जिवबादादा रत्न अमोलिक दिपवुनि गेले सकळाला। योद्धा अनुपम, मुत्सद्दीपण, गाजविले चौबाजूला ॥ जी ॥ महादजी शिंदा लढवय्या धाक जयाचा सर्वांला। जिवबादादा बक्षी खरोखर सेनापति शोभे त्याला ॥ चरित्र ऐका या वीराचें आतां सांगतों तुम्हांला। काव्यदेवते, ये झणिं आतां घेउनि वाग्भांडाराला ॥ ठेव तुझा कर मस्तकिं माझ्या, गाईन मग मी कवनाला। रचना करुनी तुझ्या कृपेनें तुष्ट करिन जनहृदयाला ॥ भक्त तुझा हा **पांडुरंग** कवि करूनि तुझ्या ग स्मरणाला। चरित्र गाईन या शूराचें रंजवील या लोकांला ॥

● ●

## चौक १ ला

गोवें प्रांतीं महाल पेडणें त्यांत गांव केरी छान। जन्मभूमि जिवबादादांची निसर्गशोभा संपूर्ण ! ॥ चाल ॥ तिथं १७४० सालाला। जिवबाचा जन्म जाहला। दिसामासा वाढूं लागला। मर्दानी खेळामधिं बाळ रंगुनी गेला॥ पोहण्याचा व्यायाम रोज त्याला। पाण्यांतनं होड्या वल्हवणं वळण देहाला ॥ जोर, कुस्ती, दंड, बैठका रोजचा नेम झाला ॥ बंदुकीचा नेम रपेट घोड्याची त्याच्या जोडीला॥ असा



देह भरदार केला। धाक त्याच्या साऱ्या लोकांला। एकदां काय प्रकार झाला। फिरंग्यांची सत्ता गोव्याला। त्यांनीं मोठा छळ मांडला। लोक सारा हवालदील झाला । गोरे सोजीर छळती लोकांला। तरी कोणी हूं कां चूं करीना त्या वेळा ॥ असा दरारा त्यांचा सर्वांला ॥ चाल ॥ दारू पिऊन गोरे सोजीर। बागाईत नासती फार ॥ तरी कोणी करीना प्रतिकार। मुकाट्यानं सोसती मार॥ एकदां तीन फिरंगी सोजीर। केरी गांवीं आले सत्वर। तेरेखोलच्या खाडींतून नाव आणली किनाऱ्याला। आणि नाव ठेवून बाजूला। एका बागेंत शिरले त्या वेळा। अन् लागले नारळा पाडायला। **जिवबा** मुलगा जवळच होता राहिला। त्यानं तो प्रकार पाहिला। अन् नांव रेतींत ठेवून दूर उभा राहिला। फिरंग्यांनीं जंवा हा प्रकार पाहिला। तंवा ते धांवले जिवबाला मारायला। दोघांनीं पकडलं जिवबाला। अन् बुटाची लाथ मारणार। तों जिवबानं फिरंग्याचे हात असे पिळले कीं ते फिरंगी लागले वोंवा मारायला। अन् जिवबानं उचललं तिसऱ्याला अन् दिलं भिरकावून समुद्रांत त्याला। बाळपणीं असा पराक्रम जिवबानं केला ॥ १ ॥

● ●

## चौक २ रा

एके दिवशीं चमत्कार झाला। कोणी एक पुरुष गेला होता स्नानाला। तो जिवबाला बोलूं लागला। "काय निजलास ? ऊठ या वेळा। अन् जा हिंदुस्थानांत तिथं मोठं वैभव मिळेल रे तुला"। दोन तीनदां असाच प्रकार झाला। तंवा जिवबा देशावर आला। कोल्हापूरला जिवबा आला। तिथं आठ दहा महिने काढले त्या गांवाला। तिथनं जिवबादादा गेले पुण्याला। बर्व्यांच्या पथकांत जिवबा दाखल झाला ॥ पुढं पेशव्यांच्या आला नजरेला। तंवा त्यांनीं वाकनिशी दिली जिवबा-

दादाला ॥ काम चोख पाहून लोभ त्याच्यावर जडला ॥ मग बर्व्यांच्या पथकावर सरदार नेमलं जिवबाला ॥ म्हैसूरच्या हैदरावर एकदां लढा सुरू झाला ॥ तंवा गोपाळराव पटवर्धन चालले सामना देण्याला ॥ जिवबादादा होते मदतीला । हैदरखान आला लढाईला । पण मराठ्यांनीं जोर फार केला । अन् हैदरचा पराभव झाला । जिवबादादा सुभेदार नेमले त्याच प्रांताला ॥ २ ॥

● ●

## चौक ३ रा

पानिपतची झाली दंगल । त्यांत वीर झाले किती ठार ॥ संग्राम झाला घनघोर । मराठ्यांना दैव प्रतिकूल ! ॥ चाल ॥ फार थोडे वांचले त्या वेळा ॥ मल्हारराव होळकर । आणि वीर नारो शंकर ॥ बाळोबा तात्या पागनीस वांचले त्या वेळा ॥ नाना फडणीस आणि पुरंदरे वांचले त्या वेळां ॥ जिवबादादा एका घोड्यानिशीं वांचले त्या स्थळा ॥ शिंद्यांचा सारा वीर रणक्षेत्रीं पहुडला ! ॥ शिंद्यांच्या जहागिरीला वारस कोण मग झाला ? । तंवा राघोबानं विचार केला । कीं "शिंद्यांची जहागीर द्यावी नारो शंकराला ॥ तंवा महादजी शिंदे गेले पुण्याला । अन् बोलले राघोबाला । " कीं शिंद्यांची जहागीर द्यावी मला । कारण मीच वारस आहे त्या गादीला ॥ तंवा एक राघो राम पागे आणि दुसरे जिवबादादा बक्षी यांनीं सांगितलं पेशव्याला । कीं शिंद्यांनीं रक्ताचा सडा घातला । हेंच कां चीज त्याचं बोला । तर जहागीर द्यावी महादजीला । आम्ही जिम्मेदार व्यवस्थेला । नाहींतर तुमचा मनसुब योग्य दिसेना आम्हांला " ॥ पेशव्यानं दिली जहागीर महादजीला । त्याला जिवबादादाच कारण झाला । पुढं जिवबादादा राहिले शिंद्यांच्या नोकरीला । तंवा त्यांना **बक्षी** असा किताब दिला । जिवबांनीं



सैन्याचा चांगला बंदोबस्त केला ! ॥ शिपायांचं प्रेम त्यांनीं खेचलं आपल्या बाजूला ॥ जरी **द बॉयन्** होता नोकरीला । तरी जिवबांचा दरारा सर्वांला । शिंद्यांच्या फौजेचा धाक नवहि खंडाला ! ॥ ३ ॥

● ●

## चौक ४ था

इकडं अहिल्याबाई होळकर होत्या इंदूर गांवाला । त्यांनीं जरा विचार केला अन् तुकोजीला आपला वारस केला । पण राघोबा संमति देईना त्याला । तंवा शिंद्यांची मदत होळकराला । जिवबादादा फौज घेऊन इंदूरला गेला ! ॥ राघोबाचा पाहून असला चाळा । माधवरावानं दूर सारलं काकाला । अन् स्वतःच कारभार करूं लागला । तंवा त्यानं तुकोजीराव वारस कबूल केला । त्याला कारण जिवबादादाच झाला । पुढं सैन्य घेऊन जिवबा उदेपुरीं गेला । तिथं मदत दिली **रतनसिंहाला** । अशा कैक लढायांत जिवबा धांवून गेला ॥ अन् शिंद्यांचा दरारा वाढविला । जिवबांनीं राष्ट्राच्यासाठीं देह झिजविला ! ॥ ४ ॥

● ●

## चौक ५ वा

१७७८ सालाला । इंग्रजांशीं सामना देण्याचा प्रसंग आला । **गॉडर्डसाहेब** फौज घेऊन दक्षिणेंत आला ॥ कर्नल **इगर्टन** आणि **कॅप्टन स्टुअर्ट** हे होते प्रमुख सरदार झुंज देण्याला ॥ दोन्ही फौजा भिडल्या एकमेकांला । पण इंग्रजांचा जोर फार झाला । रघुनाथराव होता इंग्रजांच्या बाजूला ॥ तंवा नानानं लिहिलं शिंद्याला । "फौज घेऊन आतां झडपनं यावं या वेळा" । तंवा शिंद्यांची फौज आली मदतीला । अन् जिवबादादा सेनापति झाला । तंवा **तळेगांवला**

सामना झाला । तोफखाना पुढें पसरला । मागं पायदळ अन् त्याच्या-मागें स्वार । असा व्यूह जिवबादादांनीं तयार केला ॥ तोफा लागल्या गोळे झाडायला । बंदुकींचा मारा सुरूं झाला । तो धुरळा भिडला गगनाला । इतक्यांत लढाईची तयारी पाहायला । इस्टुर फाकडा झाडावर चढला । अन् लागला दुर्बिणीनं बघायला । तों गोलंदाजानं एक गोळा झाडला । त्यांत **इस्टुर फाकडा** ठार झाला ( ४-१-१७७९ ) ।

जिवबादादांनीं पराक्रम केला । इंग्रजांनीं तह केला । अन् राघोबाला केलं स्वाधीन त्यांनीं त्या वेळा ॥ मग शिंदे गेले उज्जयिनीला । तिकडं पुन्हां इंग्रजांशीं सामना झाला । तेव्हांही जिवबादादांनीं शत्रुला चांगला मार दिला ॥ चाल ॥ रांगड्यांचीं राज्यं हिरावून । जिवबादादानं । मोठ्या हिमतीनं । जोडलीं तीं शिंदे जहागिरीला । रांगड्यांनीं त्यांचा द्वेष केला । शिंद्यांचं मन बिघडवलं त्यांनीं त्या वेळा । तंवा शिंद्यांना जिवबा नकोसा झाला । पण पुन्हां सलोखा झाला । तंव दिल्लीचीं बंडें मोडायला । जिवबादादा फौज घेऊन गेला । मग टिपूचा समाचार घ्यायला । जिवबादादा दक्षिणेंत गेला । अन् बदामीचा किल्ला मराठ्यांनीं काबीज केला ! ॥ पुन्हां जिवबादादा गेले उत्तरेला । अन् **गुलामकादरचा** कांटा दूर केला । अन् बादशाहा शहा अलमला-मदत देऊन खूष केला त्याला ! ॥ ५ ॥

● ●

### चौक ६ वा

निजामानं पेशव्यांचा होता अपमान केला । तंवा निजामावर चढाई करण्याला । जिवबादादा तयार झाला । लहानमोठे सारे सरदार चालले लढाईला । जिवबांनीं सैन्य किति घेतलं सांगतों तुम्हांला ॥ ३०००० स्वार चालला । १२००० पायदळ मदतीला । ९८ तोफा माऱ्याला । १०००० पेंढारी लुटीला । दुसऱ्यांनीं सैन्यं केलीं सज्ज त्याच वेळेला ॥ एकूण आंकडा सांगतों तुम्हांला । ८५००० स्वार, ३८००० पायदळ, १९२ तोफा अन् १०००० पेंढारी असा दळभार सज्ज केला । खर्ड्याजवळ मुकाबला केला । त्यांत जिवबांनीं हैराण केलं दुस्मान निजामाला । तंवा निजाम शरण आला । पेशव्यांनीं जिवबादादांचा गौरव केला ॥ कांहीं काळ गेल्यावर ऐका प्रकार काय झाला । जिवबांना विषमज्वर झाला । तापानं जोर फार केला । तंवा सारा हवालदिल झाला । नाना तऱ्हेचा उपाय केला ॥ पण उतार पडेना जिवबाला । हळूहळू थकवा फार आला । तोंडातनं **राम** असा आवाज निघाला । देहातनं प्राण चालला । सहा जानेवारी १७९६ सालाला । **जांब** गांवीं हिरा हरपला । सारा देश दुःखभारानं हळहळून गेला ॥ जी ॥ **पांडुरंग** शाहीर गातो त्याच्या कवनाला ॥ ६ ॥



रचना-१९४५.